# भुजबळ नॉलेज सिटी

## मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, नाशिक - ४२२००३

## <u>वाचन प्रेरणा दिन अहवाल २०१९</u>

## <u>मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी मध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा</u>

**तारीख :- १५ ऑक्टोबर २०१९.**

**वेळ -: ग्रंथ प्रदर्शन: तारीख: १५ ते १७ ऑक्टोबर, २०१९**

**सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत**

**ठिकाण -: मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी.**

दिनांक १५ ऑक्टोबर भारताचे माजी राष्ट्रपती महामहीम भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्म दिवस. शासनाने त्यांचा जन्म दिवस दर वर्षी वाचन प्रेरणा दिवस म्हणून सर्व स्तरावरून साजरा व्हावा असा निर्णय २०१५ यावर्षी घेतला, या अनुषंगाने मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी मध्ये ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथ परीक्षण स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते.

अजब डिस्ट्रिब्युटर्स व रोहिणी डिस्ट्रिब्युटर्स नाशिक आणि मेट्स इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय भव्य ग्रंथ प्रदर्शन दिनांक १५ ते १७ ऑक्टोबर २०१९ रोजी आयोजित करण्यात आले होते. ग्रंथ प्रदर्शनाबद्दल महत्वाची बाब म्हणजे रुपये १०० पासून ६०० पर्यंतचे कोणतेही पुस्तक फक्त ७० रुपयात उपलब्ध होते. कॉलेजचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आदींनी ग्रंथ प्रदर्शनाला उस्फुर्त प्रतिसाद दिला. ग्रंथ प्रदर्शनाला एकूण वाचकांनी भेट दिली.

ग्रंथालय विभागामार्फत यानिमित्ताने पुस्तक परीक्षण याविषयीची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ग्रंथालयात आलेल्या पुस्तक परीक्षणापैकी प्रथम क्रमांक कृष्णाली उकांडे (एस.वाय. बी.फार्म.), द्वितीय क्रमांक ऋतुजा लोखंडे (एस.वाय.बी.फार्म.) आणि तृतीय क्रमांक पंकज सोनवणे (टी.वाय. बी.फार्म) यांना प्रदान करण्यात आले आणि यांनी उत्कुष्ट शैलीत पुस्तक परीक्षण देखील सादर केले. विजेत्या विद्यार्थ्यांचा माननीय प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांच्या हस्ते परितोषिक देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी ग्रंथपाल श्री नितीन भामरे, उपग्रंथपाल आरती कागदे यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरता डॉ. सौ शेफाली भुजबळ व प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांचे मार्गदर्शन लाभले.

**<u>कार्यक्रमाचे समन्वयक :-</u>**

श्री. नितीन भामरे (ग्रंथपाल)

सौ.आरती कागदे (उप-ग्रंथपाल)

# वाचन प्रेरणा दिवस २०१९




*१. ग्रंथ प्रदर्शन पाहतांना शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी' व विद्यार्थी*



*२. ग्रंथ प्रदर्शनाची पाहणी करतांना माननीय प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर सर*

.